**Sakal, Nagpur, Sep 01 2012**

# टीसीएस आयटी क्विझमध्ये सेंटर पॉइंट स्कूल विजयी

नागपूर, ता. ३१ : टाटा कन्सल्टंसी सर्व्हिसेसने वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित आंतरशालेय आयटी प्रश्नमंजूषा 'टीसीएस आयटी क्विझ'मध्ये सेंटर पॉइंट स्कूल विजेते ठरले. स्पर्धेत शहरातील १४०० विद्यार्थी सहभागी झालेले होते.

प्राथमिक फेरीनंतर आणि उत्सुकता ताणून धरणाऱ्या अवघड अंतिम फेरीत सेंटर पॉइंट शाळेच्या परितोष कान्हे आणि अनिरुद्ध मोरारका यांनी बाजी मारली. विजेते चषकाचे आणि प्रत्येकी एक गॅलक्सी नोटचे मानकरी ठरले. डीपीएस शाळेच्या अभिषेक अंबुलकर आणि अबू बकर सी यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. त्यांना गॅलक्सी टॅब देऊन गौरविण्यात आले. पुरस्कार वितरण टीसीएसचे उपाध्यक्ष आणि केंद्रप्रमुख चैतन्य साठे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी चैतन्य साठे म्हणाले, 'गेल्या काही वर्षांत पुढील पिढीमधील गुणवत्तेचा माहिती तंत्रज्ञानाशी परिचय करून देण्यासाठी उत्तम व्यासपीठ म्हणून टीसीएस आयटी क्विझने आपली उपयुक्तता वेळोवेळी सिद्ध केली. टीसीएस आयटी क्विझ नागपूरमध्ये घेताना आम्हाला आनंद झाला. यापूर्वी १२ शहरांत ही स्पर्धा घेण्यात येत होती. यंदा त्यात नागपूर आणि इंदूर या दोन शहरांचा समावेश करण्यात आला. विभागीय फेऱ्या झाल्यानंतर राष्ट्रस्तरावरील अंतिम फेरीचे आयोजन डिसेंबरमध्ये करण्यात आले. या फेरीतील विजेत्याला टीसीएसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एन. चंद्रशेखरन यांच्यासोबत चहापान आणि संवाद साधण्याची संधी मिळणार आहे.